सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२

# मुंबई आवश्यक वस्तू व गुरे (नियंत्रण) अधिनियम, १९५८

(दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. LXII of 1958

# The Bombay Essential Commodities and Cattle (Control) Act, 1958

*(As modified upto 13th November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

2006

(किंमत : रु. ४-००)

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२

## मुंबई आवश्यक वस्तू व गुरे (नियंत्रण) अधिनियम, १९५८

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे पृष्ठ

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १

२. व्याख्या. १

३. अनुसूचीची सुधारणा. १

४. उत्पादन, पुरवठा, वाटणी वगैरेवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार. १

५. आदेश प्रसिध्द करणे व बजावणे. ३

६. अधिकार सोपविणे. ३

७. इतर कायद्यांशी विसंगत असणाऱ्या आदेशांचा अंमल. ३

८. सामान्य जीवनक्रमात शक्यतो कमी हस्तक्षेप करणे. ४

९. शास्ती. ४

१०. प्रयत्न आणि सहाय्य करणे. ४

११. खोटी निवेदने. ४

१२. कंपन्यांनी केलेले अपराध. ५

१३. अपराधांची दखल घेणे व त्यांची तडजोड. ५

१४. द्रव्यदंडासंबंधी खास तरतूद. ५

१५. आदेशांच्या बाबतीत अनुमान. ६

१६. विवक्षित बाबतीत सिध्द करण्याचा बोजा. ६

१७. अपराधांची संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करण्याचा अधिकार. ६

१८. अधिनियमाखाली केलेल्या उपाययोजनेस संरक्षण. ६

१९. नियम. ६

२०. रद्द करणे व बचाव. ६

२१. सन १९५५ चा अधिनियम १० यातल्या आवश्यक वस्तूंचा विचार करण्यात आला आहे त्या आवश्यक वस्तूंना हा अधिनियम लागू नसणे. ७

अनुसूची ........................................................................ ७

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६२[1]

## मुंबई आवश्यक वस्तू व गुरे (नियंत्रण) अधिनियम, १९५८

[११ जुलै, १९५८]

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे फेरफार व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ [१-१०-१९७६][2]

**सामान्य जनतेच्या हितासाठी, काही वस्तूंचे उत्पादन ने-आण, पुरवठा व वाटणी व व्यापार व वाणिज्य यांवर नियंत्रण ठेवण्याची व त्यांचे नियमन करण्याची व गुरांची निगा ठेवण्याची व ने.आण करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनिमय.**

**ज्याअर्थी,** सामान्य जनतेच्या हितासाठी, समाज जीवनास आवश्यक असलेल्या विवक्षित वस्तूंचे उत्पादन, ने-आण, पुरवठा व वाटणी यांचे नियंत्रण व नियमन करणे, आणि त्यांचा व्यापार व वाणिज्य यांचे नियंत्रण व नियमन करणे, आणि गुरांची निगा राखणे, त्यांना लायसेन्स देणे आणि त्यांची ने-आण करणे अशा वस्तूंच्या व गुरांच्या व्यापाऱ्यांना लायसेन्स देणे यासाठी व इतर विवक्षित करणांसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, मुंबई आवश्यक वस्तू व गुरे (नियंत्रण) अधिनियम, १९५८, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण मुंबई राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(क) "गुरे" याचा अर्थ, अनुसूचीच्या भाग दोन मध्ये निर्दिष्ट केलेल्या जनावरांपैकी कोणतेही जनावर, असा आहे ;

(ख) "आवश्यक वस्तू" याचा अर्थ, अनुसूचीच्या भाग १ मध्ये निर्दिष्ट केलेली वस्तू, असा आहे ;

(ग) "अधिसूचित आदेश" याचा अर्थ, राजपत्रात अधिसूचित केलेला आदेश, असा आहे.

अनुसूचीची सुधारणा.

३. राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, अनुसूचीच्या दोन्ही किंवा कोणत्याही भागात, सामान्यपणे किंवा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विवक्षित प्रदेशाच्या संदर्भात, वाढ किंवा कपात करण्यात यावी, आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर, उक्त अनुसूची त्यानुसार सुधारण्यात आली आहे, असे समजले पाहिजे.

उत्पादन, पुरवठा, वाटणी वगैरेवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार.

४. (१) कोणत्याही आवश्यक वस्तूंचा किंवा गुरांचा पुरवठा कायम ठेवण्यासाठी अथवा वाढविण्यासाठी अथवा वाजवी किंमतीत त्यांची उपलब्धता आणि न्याय्य प्रमाणात वाटणी करण्यासाठी व त्या वस्तू किंवा ती गुरे मिळू शकावी म्हणून व्यवस्था करण्यासाठी,--

(क) अशा आवश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वाटणी अथवा त्यांचा व्यापार व वाणिज्य यांचे नियमन करण्याची अथवा त्यास मनाई करण्याची ;

(ख) गुरांची निगा, ने-आण, पुरवठा व वाटणी यांचे किंवा गुरांचा व्यापार व वाणिज्य यांचे नियमन करण्याची तरतूद करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे जर राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास, आदेशाद्वारे तसे करण्याचा अधिकार असेल ;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९५८, अतिरिक्त पृष्ठ क्र. २८ पहा.

[2] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

(२) पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता त्याखाली दिलेल्या आदेशात पुढील गोष्टींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :--

(क) कोणत्याही आवश्यक वस्तूचे उत्पादन किंवा निर्मिती यांचे लायसेन्स किंवा परवाना याद्वारे किंवा अन्य रीतीने नियमन करणे ;

(ख) कोणत्याही आवश्यक वस्तूंचा साठा, ने-आण, वाहतूक, वाटणी, विल्हेवाट, प्राप्ती, उपयोग किंवा खप यांचे लायसेन्स किंवा परवाना याद्वारे किंवा इतर रीतीने नियमन करणे ;

(ग) सामान्यत: विक्रीसाठी ठेवलेल्या कोणत्याही आवश्यक वस्तूंची विक्री करण्याचे बंद करण्यास मनाई करणे ;

(घ) कोणत्याही आवश्यक वस्तूंचा साठा धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, तो सबंध साठा किंवा त्याचा निर्दिष्ट केलेला भाग आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा किंमतीस शासनाला किंवा अशा शासनाच्या अधिकाऱ्यास किंवा अभिकर्त्यास किंवा निर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास, व अशा परिस्थितीत विकण्यास भाग पाडणे ;

(ङ) कोणतीही आवश्यक वस्तू किंवा गुरे ज्या किंमतीस खरेदी करावयाची किंवा विकावयाची त्या किंमतीवर नियंत्रण घालणे ;

(च) गुरांची ने-आण, वाहतूक, वाटणी, विल्हेवाट, प्राप्ती, उपयोग व ती ठेवणे यांचे लायसेन्स किंवा परवाना याद्वारे किंवा इतर रीतीने नियमन करणे ;

(छ) उपरोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबीचे नियमन करण्याच्या किंवा तिला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने कोणतीही माहिती किंवा आंकडेवारी गोळा करणे ;

(ज) कोणत्याही आवश्यक वस्तूचे किंवा गुरांचे उत्पादन, पुरवठा किंवा वाटणी किंवा त्यांचा व्यापार किंवा वाणिज्य करणाऱ्या व्यक्तीस, त्यांच्या धंद्यासंबंधीची, आदेशात निर्दिष्ट करण्यात येतील अशी पुस्तके, हिशेब व अभिलेख ठेवण्यास व ते तपासणीसाठी सादर करण्यास व अशा धंद्यासंबंधींची, आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती पुरविण्यात भाग पाडणे ;

(झ) गुरांच्या मालकांना व तसेच ती ताब्यात असणाऱ्या, व्यक्तींना आदेशात निर्दिष्ट करण्यात येतील अशी, मालकी असलेल्या, ताब्यात असलेल्या व राखलेल्या गुरांच्या संख्येसंबंधी, पुस्तके, हिशेब व अभिलेख ठेवण्यास व ते तपासणीसाठी सादर करण्यास भाग पाडणे ;

(ञ) कोणत्याही आनुषंगिक किंवा पुरवणीच्या बाबतीत, त्यात विशेषत: जागा, वाहने व गलबते यांत प्रवेश करून त्यांची झडती घेण्याचे काम, अशी झडती घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीने, त्याला ज्या वस्तूंच्या संबंधात आदेशाचे उल्लंघन झाले आहे, होत आहे किंवा होण्याचा संभव आहे असे वाटण्यास कारण असेल अशा कोणत्याही वस्तू आणि अशा कोणत्याही वस्तू नेण्यासाठी जे वाहन, गलबत किंवा जनावर वापरले आहे, वापरले जात आहे किंवा वापरले जाण्याचा संभव आहे असे वाटण्यास कारण असेल असे कोणतेही वाहन, गलबत किंवा जनावर धरण्याचे काम ; व लायसेन्स, परवाने किंवा इतर दस्तऐवज देणे व त्याबद्दल फी आकारणे यांचा समावेश होतो.

(३) जेव्हा कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (२), खंड (ङ) यास अनुलक्षून देण्यात आलेल्या आदेशास अनुसरून, कोणतीही आवश्यक वस्तू विकेल तेव्हा, त्यास, यात पुढे तरतूद केल्याप्रमाणे त्याबद्दल किंमत देण्यात आली पाहिजे :--

(क) या कलमान्वये ठरविलेली नियंत्रित किंमत, कोणतीही असल्यास, तिच्याशी सुसंगत अशी किंमत कबूल करण्यात येईल तेव्हा कबूल केलेली किंमत ;

(ख) अशी कोणतीही किंमत कबूल करण्यात येणार नसेल तेव्हा, अशी नियंत्रित किंमत, कोणतीही असल्यास, तिला अनुसरून हिशेब करून काढलेली किंमत ;

(ग) खंड (क) किंवा खंड (ख) लागू नसेल तेव्हा, विक्रीच्या दिनांकास त्या ठिकाणी चालू असलेल्या बाजारभावावरून हिशेब करून काढलेली किंमत.

५. (१) कलम ४ अन्वये दिलेला आदेश,-- आदेश प्रसिध्द करणे व बजावणे.

(क) जर तो सर्वसामान्य स्वरूपाचा असेल किंवा व्यक्तींच्या एखाद्या वर्गास लागू असेल तर, राजपत्रात प्रसिद्ध केला पाहिजे ;

(ख) जर व्यक्ती, संस्था किंवा पेढी यांस लागू असेल तर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ हिच्या पहिल्या अनुसूचीच्या आदेश क्र. एकोणतीस, नियम २ यात किंवा यथास्थिति, आदेश क्र. तीस, नियम ३ यात समन्स बजावण्यासाठी जी रीत ठरविली आहे त्या रीतीने बजावला पाहिजे ; १९०८ चा ५.

(ग) जर, संस्था किंवा पेढी खेरीज करून इतर व्यक्तीस लागू असेल तर,--

(१) तो आदेश, त्या व्यक्तीच्या स्वाधीन करून किंवा तिला देऊ करून, किंवा

(२) पोस्टाने पाठवून, किंवा

(३) अशी व्यक्ती आढळत नसेल तर, त्या आदेशाची प्रमाणित प्रत तिच्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तीस देऊन किंवा ती व्यक्ती ज्या जागी शेवटी रहात असल्याचे किंवा धंदा चालवीत असल्याचे किंवा फायद्यासाठी काम करीत असल्याचे माहीत असेल त्या जागेच्या सहज दिसेल अशा कोणत्याही भागावर डकवून अशा व्यक्तीवर बजाविण्यात आला पाहिजे, आणि अशा रीतीने डकविण्यासंबंधीचा लेखी अहवाल तयार करून, त्याच्यावर आसपास रहाणाऱ्या दोन व्यक्तींनी साक्षीदाखल सह्या केल्या पाहिजेत.

(२) कलम ४ ला अनुसरून दिलेला आदेश एखाद्या व्यक्तीला योग्य रीतीने कळविण्यात आला होता किंवा नव्हता यासंबंधी प्रश्न उद्‌भवेल त्या बाबतीत, पोट-कलम (१) च्या आवश्यकतांचे पालन करण्यात आले होते ही गोष्ट, तिला अशा रीतीने कळविण्यात आले होते या गोष्टीचा निर्णायक पुरावा असेल ; परंतु, उक्त आवश्यकतांचे पालन करण्यात कसूर झाली होती या गोष्टीमुळे, तिला अशा रीतीने कळविण्यात आले होते हे इतर रीतीने सिद्ध करण्यास किंवा आदेशाच्या वैधतेस बाध येणार नाही.

६. राज्य शासनाला, अधिसूचित आदेशाद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, कलम ४ अन्वये आदेश देण्याचा अधिकार हा, आदेशात निर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकाऱ्यांनी किंवा प्राधिकाऱ्यांनीसुद्धा व अशा बाबींच्या संबंधात व अशा शर्ती, कोणत्याही असल्यास, त्यास अधीन राहून बजावण्याजोगा असेल. अधिकार सोपविणे.

७. कलम ४ अन्वये दिलेला किंवा दिलेला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशाचा, या अधिनियमाखेरीज इतर कोणत्याही कायद्यात किंवा या अधिनियमाखेरीज इतर कोणत्याही कायद्यामुळे अंमलात असणाऱ्या कोणत्याही लेखात त्याच्याशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट असली तरीही, अंमल असेल. इतर कायद्यांशी विसंगत असणाऱ्या आदेशांचा अंमल.

सामान्य जीवनक्रमात शक्यतो कमी हस्तक्षेप करणे.

८. या अधिनियमानुसार काम करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने सामान्य जीवनक्रमात आणि मिळकतीचा उपभोग घेण्यात जनतेच्या सामान्य हिताशी सुसंगत अशा रीतीने शक्य तेथवर कमी प्रमाणात हस्तक्षेप होईल अशा रीतीने काम चालविले पाहिजे.

शास्ती.

९. (१) जर कोणतीही व्यक्ती, कलम ४ अन्वये दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या आदेशाचे उल्लंघन करील तर, तिला,--

(एक) त्या कलमाचे पोट-कलम (२) याचा खंड (छ) किंवा खंड (ज) किंवा (झ) यांना अनुलक्षून दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल व द्रव्यदंडाच्या शिक्षेसही ती पात्र होईल,

(दोन) इतर कोणत्याही आदेशाच्या बाबतीत, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल व द्रव्यदंडाच्या शिक्षेसही ती पात्र होईल :

परंतु, फक्त द्रव्यदंडाची शिक्षा केल्याने न्यायदानाचा उद्देश सफल होईल असे जर न्यायालयाचे मत असेल तर, त्यास, नमूद करून ठेवावयाच्या कारणांसाठी, कैदेची शिक्षा न देण्याचा अधिकार असेल.

(२) आदेशाचे उल्लंघन करण्यात आल्याच्या अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या कोणत्याही न्यायालयास, उक्त आदेशाचे उल्लंघन ज्या मालमत्तेच्यासंबंधाने झाले आहे अशी न्यायालयाची खात्री झाली असेल ती मालमत्ता आणि अशी मालमत्ता नेण्याच्या कारणासाठी जे कोणतेही वाहन, गलबत किंवा जनावर वापरण्यात आल्याची माहिती, ते ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस होती अशी न्यायालयाची खात्री झाली असेल तर न्यायालयाला असे वाहन, गलबत किंवा जनावर सरकारजमा करण्याचा निदेश देण्याचा अधिकार आहे :

परंतु, संपूर्ण मालमत्तेच्या बाबतीत किंवा, यथास्थिती तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत ती सरकारजमा करण्याची आवश्यकता नाही असे जर न्यायालयाचे मत असेल तर, त्यास, नमूद करून ठेवावयाच्या कारणांसाठी, तसे न करण्याचा अधिकार आहे.

प्रयत्न आणि सहाय्य करणे.

१०. जी कोणतीही व्यक्ती, कलम ४ अन्वये दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा तशा उल्लंघनाच्या कृत्यांत सहाय्य करील त्या व्यक्तीने त्या आदेशाचे उल्लंघन केले आहे असे समजण्यात येईल.

खोटी निवेदने.

११. जर कोणतीही व्यक्ती,--

(एक) तिला कलम ४ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशावरून कोणते निवेदन करण्यास किंवा कोणतीही माहिती पुरविण्यास भाग पाडले असता, जे कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलात खोटे आहे आणि जे खोटे आहे हे तिला माहीत असेल किंवा तसे वाटण्यास वाजवी कारण असेल किंवा जे खरे आहे असे तिला वाटत नसेल असे कोणतेही निवेदन करील किंवा अशी कोणतीही माहिती पुरवील, किंवा

(दोन) अशा कोणत्याही आदेशावरून तिने जे कोणतेही पुस्तक, हिशेब, अभिलेख, प्रतिज्ञापत्र, पत्रक, किंवा इतर दस्तऐवज ठेवणे किंवा पुरवणे आवश्यक असेल त्या कोणत्याही पुस्तकात, हिशेबात, अभिलेखात, प्रतिज्ञापत्रात, पत्रकात किंवा इतर दस्तऐवजात वर सांगितल्याप्रमाणेच कोणतेही निवेदन करील,

तर तिला, दोषी ठरविण्यात आल्यावर तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१२. (१) कलम ४ अन्वये दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती जर एकादी कंपनी असेल तर, उल्लंघन घडल्याच्या वेळी कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनी ज्या व्यक्तीच्या स्वाधीन होती आणि जी व्यक्ती तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती व त्याचप्रमाणे कंपनी ही उल्लंघन केल्याबद्दल दोषी आहेत असे समजले पाहिजे आणि ती त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र असतील : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, जर कोणतीही अशी व्यक्ती, असे उल्लंघन तिच्या नकळत घडले आहे किंवा असे उल्लंघन होऊ नये म्हणून तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे शाबीत करील तर, ती, या पोट-कलमांतील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, जेव्हा एकाद्या कंपनीकडून या अधिनियमाखालील अपराध घडला असेल आणि तो अपराध कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, चिटणिसाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याच्या कोणत्याही हयगयीमुळे घडला आहे असे शाबीत करण्यात येईल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी, त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यात आले पाहिजे आणि तो त्याप्रमाणे त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनांसाठी,--

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणतीही निगम निकाय, असा आहे, आणि त्यात, एखाद्या पेढीचा किंवा व्यक्तींच्या इतर संस्थेचा समावेश होतो ; आणि

(ख) एखाद्या पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, उक्त पेढीचा भागीदार, असा आहे.

१३. (१) कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमाखाली शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची, अशा अपराधात अंतर्भूत असलेल्या गोष्टींसंबंधी लेखी अहवाल, अशा अपराधामुळे नुकसान पोचलेल्या व्यक्तीने किंवा भारतीय दंड संहिता हिचे कलम २१ यात व्याख्या केल्याप्रमाणे लोकसेवक असलेल्या व्यक्तीने सादर केले असेल ते खेरीज करून, दखल घेता कामा नये. अपराधांची दखल घेणे व त्यांची तडजोड.

सन १८६० चा ४५.

(२) उपरोक्त लोकसेवकास, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबाबतची कार्यवाही दाखल करण्यात येण्यापूर्वी किंवा आल्यानंतर, अशा अपराधाबद्दल ज्यावर आरोप ठेवण्यात आला असेल त्या व्यक्तीकडून, अशा अपराधाच्या तडजोडीदाखल एक हजार रुपयांहून अधिक नाही इतकी रक्कम स्वीकारण्याचा आणि या अधिनियमान्वये जप्त केली जाण्यास पात्र असलेली कोणतीही मालमत्ता, तिची तिने अंदाजलेली किंमत देण्यात आल्यावर मुक्त करण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) अशा व्यक्तीने यथास्थिति, अशी रक्कम किंवा किंमत किंवा दोन्ही दिल्यावर, तिला कैदेत ठेवण्यात आले असेल तर सोडून दिले पाहिजे आणि तिच्याविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात कोणतीही कार्यवाही दाखल करण्यात आली असेल तर, उक्त तडजोड केल्यामुळे तिला मुक्त करण्यात आले आहे, असे समजले पाहिजे आणि त्याच अपराधाच्या संबंधात अशा व्यक्तीविरुद्ध किंवा मालमत्तेविरुद्ध आणखी कोणतेही कार्यवाही दाखल करता कामा नये.

सन १८९८ चा ५.

१४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८[१] चे कलम ३२ यात काहीही अंतर्भूत असले तरी, याबाबत राज्य शासनाने खास रीतीने अधिकार दिलेल्या पहिल्या वर्गाच्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याने आणि कोणत्याही शहर दंडाधिकाऱ्याने द्रव्यदंडासंबंधी खास तरतूद.

---

[१] आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

कलम ४ खाली दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याच्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असल्याप्रमाणेच्या त्या कलमात निर्दिष्ट केलेल्या पैक्शासंबंधी मर्यादेपेक्षा अधिक रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा करणे कायदेशीर असेल.

आदेशांच्या बाबतीत अनुमान.

**१५.** जेव्हा एखादा आदेश, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करून, एखाद्या प्राधिकाऱ्याने दिला आहे आणि त्यावर सही केली आहे असे समजण्यात येत असेल तेव्हा, असा आदेश त्या प्राधिकाऱ्याने भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ याच्या अर्थानुसार, दिला होता, असे न्यालयाने गृहीत धरले पाहिजे. १८७२ चा १.

विवक्षित बाबतीत सिध्द करण्याचा बोजा.

**१६.** जेव्हा, कलम ४ अन्वये दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या, कोणतेही कृत्य करण्याची किंवा कायदेशीर अधिकारपत्रावाचून किंवा परवाना, लायसेन्स किंवा इतर दस्तऐवज या शिवाय एखादी गोष्ट कब्ज्यात ठेवण्याची एखाद्या व्यक्तीस मनाई करणाऱ्या, कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल एखाद्या व्यक्तीवर कार्यवाही करण्यात आली असेल तेव्हा, तिच्याजवळ असे अधिकारपत्र, परवाना, लायसेन्स किंवा इतर दस्तऐवज आहे असे सिद्ध करण्याचा बोजा तिच्यावर राहील.

अपराधांची संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करण्याचा अधिकार.

**१७.** [१] फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम २६०, पोट-कलम (१) यात निर्दिष्ट केलेल्या अपराधांची संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करण्याचा तात्पुरता अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास किंवा दंडाधिकाऱ्याच्या खंडपीठास, खटला दाखल करणाऱ्या व्यक्तींने या संबंधात अर्ज केला असता, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ यांतील तरतुदींना अनुसरून केली पाहिजे. १८९८ चा ५.

अधिनियमाखाली केलेल्या उपाययोजनेस संरक्षण.

**१८.** (१) कलम ४ अन्वये दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशास अनुसरून, सद्‌भावनेने केलेल्या किंवा करावयाचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

(२) कलम ४ अन्वये दिलेल्या किंवा दिला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशास अनुसरून, सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्यापुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल शासनाविरुध्द कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम.

**१९.** राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि पूर्वप्रसिध्द करण्याच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाचे प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याचा अधिकार आहे.

रद्द करणे व बचाव.

**२०.** (१) मध्यप्रांत व वऱ्हाड निर्दिष्ट वस्तू (नियंत्रण) अधिनियम, १९४६, आणि सौराष्ट्र आवश्यक वस्तू व गुरे (नियंत्रण) अध्यादेश, १९४८ हे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. सन १९४६ चा मध्यप्रांत व वऱ्हाड क्र. १२.

(२) अशा रीतीने वरील अध्यादेश व अधिनियम रद्द करण्यात आले असले तरीही, आवश्यक वस्तूंच्या किंवा गुरांच्या संबंधात अशा रीतीने रद्द केलेल्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्यान्वये कोणतेही आदेश दिले असतील तर, किंवा अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कोणतेही कामकाज अनिर्णित असेल तर, असे आदेश किंवा कार्यवाही या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात आले आहे व अंमलात असण्याचे चालू ठेवण्यात आले आहे किंवा यथास्थिति, अनिर्णित आहे असे समजले पाहिजे आणि त्यानुसार अशी कार्यवाही या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये चालू ठेवण्यात व निकालात काढण्यात आली पाहिजे. १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्र. १८.

---

[१] आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

१९५५ चा १० **२१.** आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये आवश्यक वस्तू असलेल्या किंवा आवश्यक वस्तू म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही वस्तूला किंवा वस्तूच्या वर्गाला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही आणि जर अनुसूचीचा भाग एक यात समाविष्ट केलेली कोणतीही वस्तू त्या अधिनियमान्वये आवश्यक वस्तू म्हणून जाहीर करण्यात आली असेल तर, अशा रीतीने जाहीर केल्यानंतर, असे जाहीर करण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल ते खेरीज करून, हा अधिनियम तिला लागू असण्याचे बंद होईल. सन १९५५ चा अधिनियम १० यात ज्या आवश्यक वस्तूंचा विचार करण्यात आला आहे त्या आवश्यक वस्तूंना हा अधिनियम लागू नसणे.

## अनूसूची

### भाग एक

**आवश्यक वस्तू**

१. घर बांधण्याच्या कारणासाठी वापरलेल्या विटा (ब्रिक्स.)

### भाग दोन

**गुरे**

१. वळू बैल.
२. बैल.
३. गाई.
४. कालवडी.
५. वासरे.
६. म्हशी.
७. बकऱ्या.
८. मेंढ्या.

---

एच. ६२-(६,०८२ पु.)-१२-२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.